म्हाडाच्या गोरेगाव सिध्दार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने म्हाडाने जारी केलेल्या दि.२६.०७.२०११ चे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच दि.०९.११.२०११ च्या संयुक्त करार पत्रान्वये केलेल्या सुधारणा संदर्भात चौकशी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्रमांक : वाटप- २०१८/प्र.क्र.१४३/गृनिप
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २८ मार्च, २०१८

प्रस्तावना-

मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथील पत्राचाळ मधील गोरेगाव सिध्दार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकास प्रक्रियेमध्ये म्हाडाने दि.२६.०७.२०११ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहे. त्याचप्रमाणे तद्नंतर या पुनर्विकासासंदर्भातील दि.१०.०४.२००८ रोजीच्या त्रिपक्षीय करार नाम्यामध्ये दि.०९.११.२०११ च्या सुधारित त्रिपक्षीय करार नाम्यान्वये काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्पाच्या मुळ विकासकाने प्रकल्पातील विक्री हिस्सा काही विकासकांना विकला आहे. म्हाडाने सदर प्रकल्प (विक्री हिश्श्यासह) ताब्यात घेण्यासाठी दि.१२.०१.२०१८ रोजी नोटीस जारी केली आहे. सदर नोटीशी विरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने म्हाडाच्या दि.२६.०७.२०११ चे ना-हरकत प्रमाणपत्र व दि.०९.११.२०११ च्या करारनाम्यान्वये केलेल्या सुधारणाच्या अनुषंगाने म्हाडाच्या संबंधित अधिकाऱ्यांची भुमिका तपासून घेण्याबाबत मौखीकरित्या निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने म्हाडाने केलेल्या विनंतीनुसार श्री. कामदार, ज्येष्ठ विधिज्ञ यांनी दि.०८.०३.२०१८ रोजी आपले अभिप्राय म्हाडास सादर केले आहेत. सदर ना-हरकत प्रमाणपत्र, सुधारीत करारनामा व त्या अनुषंगाने ज्येष्ठ विधिज्ञ यांचे अभिप्राय विचारात घेऊन त्यासंदर्भात सविस्तर चौकशी करण्याकरिता सेवा निवृत्त मुख्य सचिवांची नियुक्ती करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. आता त्या संदर्भात शासनाने श्री. जॉनी जोसेफ, निवृत्त मुख्य सचिव यांची नियुक्ती या प्रयोजनार्थ करण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः-

मुंबईतील गोरेगाव (पश्चिम) येथील पत्राचाळ मधील गोरेगाव सिध्दार्थ नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकास प्रक्रियेमध्ये म्हाडाने दि.२६.०७.२०११ रोजी जारी केलेले ना-हरकत प्रमाणपत्र व तद्नंतर दि.०९.११.२०११ च्या करारनाम्यान्वये मुळ करारनाम्यान्वये केलेल्या सुधारणा व या सदर्भात श्री. कामदार, ज्येष्ठ विधिज्ञ यांनी दि.०८.०३.२०१८ रोजी दिलेले अभिप्राय विचारात घेऊन या प्रकरणी सखोल चौकशी करण्याकरिता श्री. जॉनी जोसेफ, निवृत्त मुख्य सचिव यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर चौकशीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

१. म्हाडाने दिनांक २६.०७.२०११ रोजी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व त्यानंतर दि.१०.०४.२००८ च्या मूळ करारनाम्यामध्ये दि.०९.११.२०११ च्या करारनाम्याद्वारे केलेल्या सुधारणा व या अनुषंगाने श्री. कामदार , वरिष्ठ विधीज्ञ यांनी म्हाडास दि.०८.०३.२०१८ रोजी उपलबध करुन दिलेले अभिप्राय विचारात घेऊन या प्रकरणी सखोल चौकशी करणे.

२. अनियमितता आढळून आल्यास त्यास कोण जबाबदार आहेत, याबाबत अहवाल व शिफारशी शासनास सादर करणे.

श्री. जॉनी जोसेफ, निवृत्त मुख्य सचिव यांनी आपला अहवाल १ महिन्याच्या कालावधीत शासनास सादर करावा.

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी या अनुषंगाने आवश्यक सर्व कागदपत्रे श्री. जोसेफ यांना उपलब्ध करुन द्यावीत. त्यांना या प्रकरणी आवश्यक ते सहकार्य करावे.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३२८१९०३३२८१०९ असा आहे. प्रस्तुत शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manohar Ramchandra Parkar

Digitally signed by Manohar Ramchandra Parkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c4c0810e9c94cf92d42a36d93c8f7b6ac18542c1ee758c9cfddcea906d9cf544, serialNumber=fb43688343316856c0f7e793462127aa87fce45724e87929c6889798cd7d2c62, cn=Manohar Ramchandra Parkar
Date: 2018.03.28 19:05:11 +05'30'

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-३५.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-३२.
४) मा. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
५) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
६) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
७) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.
८) महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा).
९) महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा).
१०) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
११) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई-५१.
१२) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई-५१.
१३) गृहनिर्माण विभागातील उप सचिव
१४) निवड नस्ती - गृनिप.